सहकारी साखर कारखान्याना साखर निर्यात अनुदान वितरीत करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन,**
**सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः ससाका- २०१८/प्र.क्र.२५८/२५ स,**
मंत्रालय विस्तार, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक ३०.०३.२०१९.

**वाचा :-**

१) शासन निर्णय क्रमांकः शासन निर्णय, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, क्रमांक:-ससाका- २०१५/प्र.क्र.५३ /२५ स, दिनांक २३/०६/२०१५
२) शासन निर्णय क्रमांकः शासन परिपत्रक वित्त विभाग क्रमांक:- पूरक २०१५/प्र.क्र.१४०/ अर्थसंकल्प-३, दिनांक ६/१०/२०१५
३) शासन निर्णय सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, क्रमांक: ससाका २०१५/प्र.क्र.२४३/२५स, दि. २३/३/२०१६, दि. २८/३/२०१६ व दि.८.११.२०१६
४ ) शासन निर्णय, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग,क्र.ससाका-२०१७/प्र.क्र.४९/२५-स दि. २०.७.२०१७
५) शासन निर्णय, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग,क्र.ससाका-२०१७/प्र.क्र.४९/२५-स दि.१७.२.२०१८
६) शासन निर्णय सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग,क्र. पुनर्वि २०१८/प्र.क्र.१७/१८ /१७-स दि.१९.३.२०१८
७) शासन निर्णय, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग,क्र.ससाका-२०१७/प्र.क्र.२०५/२५स दि.२१.०३.२०१८
८) वित्त विभाग शासन परिपत्रक क्रमांक:-अर्थसं २०१८/प्र.क्र.६९/अर्थ ३, दिनांक २५.०१.२०१९
९) साखर आयुक्त पत्र क्र.साआ/उपप/कक्ष १२/सानि अनुदान/उर्वरीत मागणी/१८, दि.२८.९.२०१८, दि.३.११.२०१८
१०) सहसंचालक (उपपदार्थ), पुणे पत्र क्र.साआ/उपप/कक्ष १२/सानिअनु/खाजगी साखर कारखाने/एसएलपी ३३५१३/२०१८/१९, दि.२६.०२.२०१९.

**प्रस्तावना :-**

राज्यातील हंगाम २०१४-१५ मध्ये उत्पादीत झालेल्या विक्रमी साखरेचे देशांतर्गत विपणन चालू बाजारभावात केल्यास साखर कारखान्यांना आर्थिक नुकसान होण्याची शक्यता होती. म्हणून राज्यातील उत्पादित कच्च्या साखरेच्या २०१४-१५ या कालावधीतील निर्यातीसाठी प्र.मे.टन रु.१०००/- प्रोत्साहनपर रक्कम अदा करण्याचा शासन निर्णय क्रमांक ससाका २०१५/प्र.क्र.५३/२५-स, दि.२३/६/२०१५ निर्गमित करण्यात आला आहे. साखर आयुक्त, पुणे ह्यांनी शासन निर्णय दि.२३.६.२०१५, दि. २३.३.२०१६ व दि.२८.३.२०१६ मधील निर्देशाप्रमाणे या योजनेअंतर्गत प्राप्त साखर निर्यात अनुदानाचे प्रस्ताव तपासून त्यांच्या स्तरावर

मान्यता द्यावी व अनुज्ञेय तरतुद वितरीत करण्यासाठी विहित प्रस्ताव शासनास सादर करण्याबाबत शासन निर्णय क्रमांक ससाका २०१५/प्र.क्र.२४३/२५-स, दि.८.११.२०१६ निर्गमित करण्यात आला आहे. त्यानुषंगाने साखर आयुक्त यांनी क्र.साआ/उपप/ कक्ष-१२/क.सा.नि.अनुदान/ उर्वरीत मागण्या २०१८, दि.२८.०९.२०१८ च्या पत्रान्वये सादर केलेल्या प्रस्तावानुसार सहकारी साखर कारखान्यांना अनुज्ञेय निर्यात अनुदानाची रक्कम रु.१,९९,९०,४५०/- तरतूद वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**<u>शासन निर्णय :-</u>** शासन निर्णय क्रमांक ससाका २०१५/प्र.क्र.५३/ २५-स, दि.२३/६/२०१५ आणि शासन निर्णय क्रमांक ससाका २०१५/प्र.क्र.२४३/२५-स, दि.८.११.२०१६ मधील निर्देशाप्रमाणे साखर आयुक्त यांनी सादर केलेल्या प्रस्तावानुसार सहकारी साखर कारखान्यांना अनुज्ञेय निर्यात अनुदानाची शिल्लक रु.१,९९,९०,४५०/- (रुपये एक कोटी नव्याण्णव लाख नव्वद हजार चारशे पन्नास फक्त) इतकी रक्कम सन २०१४-१५ या गळीत हंगामात ऊस उत्पादक शेतकऱ्यांना FRP ची रक्कम देता यावी म्हणून साखर कारखान्यांना द्यावयाच्या सवलती अंतर्गत पात्र सहकारी साखर कारखान्यांना साखर निर्यात अनुदान वितरीत करण्यास या शासन निर्णयाव्दारे मंजूरी देण्यात येत आहे.

२. सदर रक्कमेचे आहरण करुन संबंधितांना संवितरण करण्याकरिता लेखाधिकारी, साखर आयुक्तालय, साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे यांना "आहरण व संवितरण अधिकारी" आणि संचालक (प्रशासन), साखर आयुक्तालय, पुणे यांना "नियंत्रण अधिकारी" म्हणून घोषित करण्यात येत आहे. त्यांनी वरील निर्णयानुसार मंजूर करण्यात आलेल्या साखर निर्यात अनुदान रक्कम कोषागार अधिकारी, पुणे येथून पात्र सहकारी साखर कारखान्याच्या नावावर धनादेश काढुन RTGS ने वितरीत करण्याची कार्यवाही करावी. त्यांनी सदर तरतूद वितरीत करताना वित्त विभागाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या सुचनांचे आणि प्रचलित वित्तीय नियमाचे, अटीचे व शर्तीचे पालन करण्याची दक्षता घ्यावी.

३. ज्या पात्र सहकारी साखर कारखान्यांनी ऊस उत्पादक शेतकऱ्यांना किमान वैधानिक दर FRP दिला नसेल त्या कारखान्याने प्रथम या अनुदानातून FRP पोटी देय असलेली रक्कम ऊस उत्पादक शेतकऱ्यांना अदा करावी. तसेच ज्या कारखान्याकडे शासकीय थकबाकी आहे, अशा साखर कारखान्यांकडील देणी या अनुदानातुन कपात करुन उर्वरित रक्कम त्यांना अदा करणेचे कार्यवाही संबंधित जिल्हा / राज्य बँकेने करावी व तसा विनियोग दाखला संबंधित विशेष लेखा परिक्षक वर्ग -१ यांचे मार्फत साखर आयुक्त यांचे कार्यालयास सादर करावा. वरीलप्रमाणे कारखान्यांना अनुदान वितरीत करण्याबाबतच्या अटी व शर्ती शासन निर्णय दि.२३.६.२०१५ आणि दि.८.११.२०१६ मध्ये नमूद केल्याप्रमाणे राहतील.

४. या प्रित्यर्थ होणारा खर्च मागणी क्रमांक व्ही-२ मुख्यलेखाशिर्ष २४२५- सहकार (१०८) इतर सहकारी संस्थांना सहाय्य ०३ सहकारी साखर कारखाने (०३) (१२) सहकारी साखर कारखान्यांना साखर निर्यातीसाठी आर्थिक सहाय्य (२४२५ १३६८) दत्तमत्त ३३ अर्थसहाय्य (योजनेतर) या लेखाशिर्षाखाली सन २०१८-१९ मध्ये उपलब्ध झालेल्या अर्थसंकल्पीय तरतूदीतून भागवावा.

५. प्रमाणित करण्यात येते कि, या प्रकरणी शासन परिपत्रक वित्त विभाग क्रमांक - अर्थसं-२०१८/प्र.क्र.६९/अर्थ-३,दि.२५.०१.२०१९ मधील आणि सोबतच्या परिशिष्टातील

संबंधित अटींची पूर्तता झाली आहे. साखर आयुक्त, पुणे यांनी सदर तरतूद वितरीत करताना तसेच खर्च करताना महाराष्ट्र अर्थसंकल्प नियमपुस्तिका व वित्तीय अधिकार नियमपुस्तिकेमध्ये उल्लेख केलेल्या तसेच वित्त विभागाच्या दि.२५.०१.२०१९ च्या परिपत्रकातील अटी व शर्तीचे व वेळोवेळी दिलेल्या सुचनांचे पालन करण्याची दक्षता घ्यावी. सदरहू शासन निर्णय हा वित्त विभाग शासन परिपत्रक क्रमांक:-अर्थसं -२०१८/प्र.क्र.६९/अर्थ ३, दिनांक २५.०१.२०१९ अन्वये प्रशासकीय विभागास मिळालेल्या प्राधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०३३०१६१७५२२९०२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Pramod Mankoji Valanj

Digitally signed by Pramod Mankoji Valanj
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Co-Operation, Marketing and Textiles Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=e9e7fafe78ccbad1148295b75b2b4a0fc30e01ea267cb61e5d741e2bf211f323, cn=Pramod Mankoji Valanj
Date: 2019.03.30 16:56:46 +05'30'

**( प्रमोद वळंज )**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत :-**

१. मा. मंत्री ( सहकार ) यांचे खाजगी सचिव
२. मा. प्रधान सचिव ( सहकार ),सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग , मंत्रालय ,मुंबई
३. साखर आयुक्त, साखर संकुल , पुणे,
४. महालेखापाल, महाराष्ट्र -१/२, मुंबई, नागपूर,
५. कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी साखर कारखाना संघ मर्यादित,नरिमन पॉईंट, मुंबई
६. कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक मर्यादित, मुंबई.
७. कार्यकारी संचालक, संबंधित सहकारी साखर कारखाने , साखर आयुक्त, पुणे यांच्या मार्फत.
८. सर व्यवस्थापक , जिल्हा मध्यवर्ती बँक लि. सातारा/औरंगाबाद /सोलापूर/कोल्हापूर/हिंगोली /अहमदनगर
९. अधिदान व लेखाधिकारी, मुंबई.
१०.निवासी लेखा अधिकारी, मुंबई,
११.जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे,
१२.वित्त विभाग, व्यय-२/ कराधान-३/ अर्थसंकल्प-३/ अर्थसंकल्प-१२,
१३.सर्व सह सचिव/उप सचिव /अवर सचिव व कक्ष अधिकारी, सहकार पणन व वस्त्रोद्योग विभाग,मंत्रालय, मुंबई,
१४.अवर सचिव ( अर्थसंकल्प ), सहकार पणन व वस्त्रोद्योग विभाग,मंत्रालय, मुंबई,
१५.निवडसंग्रह (२५-स) सहकार पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई.